# महात्म्याशी भेट



माझं बालपण महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमात गेलं हे कळलं, की अनेक जण उत्सुकतेनं हा प्रश्न विचारतात. मी काय उत्तर द्यावं? माझा जन्मच मुळी त्यांच्या मृत्यूनंतर झाला. त्यामुळे ज्यांनी गांधीजींना पाहिलेलं नाही अशा सहा अब्ज लोकांपैकी मीही एक; पण मी त्यांना जवळपास रोजच भेटतो. ते आपले आजोबा असावेत आणि त्यांचंच रक्त आपल्या शरीरात धावत असावं, असं मला जाणवत राहतं. माझ्या प्रत्येक कृतीकडे ते आपल्या मिशाळ स्मितासह वात्सल्याने; पण अपेक्षेनं बघत असतात. मी चुकीचं वर्तन केलं तर क्रुसावर गांधी चढत असतो. जेव्हा जेव्हा गंभीर निर्णयाचा क्षण माझ्या जीवनात येतो, तेव्हा मी त्यांनाच भेटून विचारत असतो, ""बापू, मी आता काय करू?"

महात्म्याशी अशा झालेल्या काही भेटींच्या या आठवणी. आठवणी व्यक्तिगत आहेत आणि सार्वत्रिकही.

**"माझा जन्मच मुळी गांधीजींच्या मृत्यूनंतर झाला. त्यामुळे ज्यांनी गांधीजींना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही, अशा सहा अब्ज लोकांपैकी मी एक; पण मी त्यांना जवळपास रोजच भेटतो..." महात्म्याशी अशा झालेल्या काही भेटींच्या आठवणी... "तुम्ही खरंच त्यांना प्रत्यक्ष भेटलात?"**

* * * *

दोन ऑक्टोबरला गांधी जयंती कशी साजरी करावी? आरत्या, खिरापती व मिठाई वाटून? पण "गरिबातल्या गरीब माणसासोबत एकरूप व्हा,' हा गांधीजींचा संदेश आणि "स्वकष्टाने कमावलेल्या भाकरीवरच तुला अधिकार आहे,' हे त्यांचं तत्त्व.

आश्रमातील शाळेत गांधी जयंतीला दारिद्र्यनारायणाशी एकरूप व्हायचा श्रमोत्सव चालायचा. "आज दिवसभर उपाशी राहून शेतकऱ्यासारखं शेतात परिश्रम करून किंवा चरख्यावर सूत कातून स्वतः कमावलेल्या मजुरीएवढंच अन्न संध्याकाळी आज आपल्याला मिळणार." संध्याकाळपर्यंत हातांना फोड आलेले होते. घामानं चिंब अंग ठणकत होतं. पोटात भुकेचा डोंब; पण मजुरी थोडी निघाली. त्यात किती खायला मिळणार? जेव्हा त्या लहानशा भाकरीनं माझ्या भुकेच्या ताटाचा एक कोपराही भरला नाही तेव्हा भूक म्हणजे काय, कुपोषण म्हणजे काय, मजुरांची मजुरी आणि शेतकऱ्याच्या श्रमाचं मूल्य किती असायला हवं या सर्व ब्रह्मप्रश्नांशी प्रत्यक्ष भेट झाली. वस्तुतः माझ्या पुढील आयुष्यात समाजसेवा म्हणून ज्या प्रश्नांवर मी काम केलं त्यापैकी अनेकांशी माझी पहिली भेट गांधी जयंतीला झाली. या दरिद्री देशात प्रथम परमेश्वरालाही भाकरीच्या रूपातच दर्शन द्यावं लागेल, असं गांधीजी म्हणालेच होते.

* * * *

हाफपॅंट घालून दोन मुलं सायकलनं वर्धा जिल्ह्यातल्या पिपरी गावाकडे जात होते. सोळा वर्षांचा माझा मोठा भाऊ अशोक व तेरा वर्षांचा मी. आम्ही दोघंही तेव्हा सेवाग्राममध्ये गांधीजींनी सुरू केलेल्या "नयी तालीम' पद्धतीच्या शाळेत शिकत होतो. अशोकने सायकल थांबवली. "आता आपण मोठे झालो आहोत. आपल्या जीवनाचं काय करायचं हे आपण ठरवायला हवं," असं तो म्हणाला. मी मान डोलावली. आताच्या भाषेत, "कोणतं करिअर निवडावं,' याबद्दल आम्ही दहा मिनिटं सखोल चर्चा केली. सगळ्यात दुःखी, कष्टी, असाह्य लोक खेड्यातील होते. त्यांच्या पोटात भूक व अंगावर जखमा व रोग होते. आमच्यापैकी एकानं खेड्यातील शेती सुधारावी व दुसऱ्यानं आरोग्य सुधारावं, असं आमचं ठरलं. अशोक म्हणाला, "मी शेती सुधारतो." त्यामुळे आरोग्याची जबाबदारी माझ्यावर आली. पुढे अशोक कृषितज्ज्ञ झाला. विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्याची शेती कशी सुधारता येईल, या विषयावर तो आयुष्यभर काम करतो आहे. पदरी पडल्यानुसार मी डॉक्टर झालो. पुढे गडचिरोलीला आलो. "आरोग्य-स्वराज्य' कसं निर्माण करावं हाच माझा आयुष्यभराचा
शोध झाला.

आम्ही दोघांनी जेव्हा त्या दिवशी नियतीशी हा करार केला, तेव्हा रस्त्याच्या त्या वळणावर बाजूला महात्मा कौतुकानं बघत उभा होता. केव्हातरी तो म्हणाला होता, ""मी तुम्हाला जादूचा ताबीज देतो. "काय निर्णय घेऊ' असा प्रश्न जेव्हा पडेल तेव्हा जीवनात पाहिलेल्या सर्वांत दुःखी, निर्बल माणसाचा चेहरा डोळ्यांसमोर आणा."

* * * *

अलाहाबादला गांधीजी पहिल्यांदाच नेहरूंकडे आनंदभवनमध्ये आलेले होते. तरुण जवाहर स्वतः त्यांची खातीरदारी करीत होते. सकाळी गांधीजी तोंड धूत जवाहरशी गप्पा मारत होते. बोलता बोलता बराच वेळ पाणी उगाच सांडत राहिलं. गांधीजी अचानक भानावर आले व पाणी वाया घालवल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. तरुण गर्भश्रीमंत जवाहर हसत म्हणाले, ""बापू, काही काळजी करू नका. हे अलाहाबाद आहे, जिथे गंगा व यमुना दोन्ही वाहतात."""हो जवाहर. मला माहीत आहे; पण गंगा-यमुना माझ्यासाठी वाहत नाहीत."

पर्यावरण चळवळ सुरू होण्याच्या किमान पन्नास वर्षे अगोदर गांधींना हे भान होतं, की नैसर्गिक संपदा मानवानं अनिर्बंध उधळण्यासाठी नाही. तिला स्वतःचं पवित्र अस्तित्व आहे आणि मूल्यही आहे. आवश्यक तेवढीच वापरा. आपल्या गरजा कमी करा.

ही आठवण वाचली, तेव्हा मी नुकताच नागपूरला मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. मी उठलो. खोलीतला विजेवर चालणारा पंखा बंद केला. पंख्याविना मला जगता आलं पाहिजे. वैद्यकीय शिक्षणाची पुढील पाच वर्षे नागपूरच्या उन्हाळ्यातही मी पंख्याविना काढली. जणू पुढे गडचिरोलीला जाण्यासाठी पूर्वतयारी झाली.

* * * *

गडचिरोलीतील वास्तव्याच्या दुसऱ्या वर्षी एक प्रसंग घडला. गावाबाहेरील एका घरात तेव्हा आम्ही राहत होतो. बाजूला ओसाड जागा. तिथे हिवाळ्यात काही भटक्या लोकांनी आपली पालं टाकली होती. एका रात्री प्रचंड गोंधळ, किंकाळ्या व रडारड ऐकू येत राहिली. दारूच्या नशेत नवऱ्यानं बायको-मुलांना हाणमार करून आपलं पाल व त्यातील चीजवस्तू पेटवून दिली आणि पळून गेला. सकाळी उठून पाहिलं. राखेच्या ढिगाऱ्यासमोर मार खाल्लेली, कपडे फाटलेली एक आई आणि तिची भेदरलेली सात मुलं थंडीत थरथर कापत उभी होती. राणीनं तिला पांघरूण व खायला दिलं. मला त्या रात्री झोप येईना. कितीतरी बायांना दारूमुळे असा त्रास होतो. ही समस्या कशी सोडवावी? "पण हे तुझं काम नाही. दारूचा प्रश्न भयानक आहे. दारूचे गुत्तेदार, स्थानिक राजकीय नेते व राज्य सरकार सर्वच या व्यापारात गुंतलेले आहेत. तू डॉक्टर आहेस. तू यात काय करशील? हा राक्षस फार मोठा आहे. तू आपले रोगी बघ. संशोधन कर."

पण त्या मार खाल्लेल्या आईचे डोळे? तिची भेदरलेली मुलं? विसरता येईना. यांना सोडून कसं पळता येईल?

गांधीजींनी काय केलं असतं? शोधू लागलो. "मला एक तासासाठी हिंदुस्थानचा हुकूमशहा बनवलं तर सर्वांत प्रथम मी सर्व दारूची दुकानं व परवाने रद्द करीन."

वा! या प्रश्नावर गांधी आपल्यासोबत आहेत. हिंमत वाढली. त्यांनी काय केलं होतं? चक्रवर्ती राजगोपालाचारींना या प्रश्नाची जबाबदारी देऊन शासकीय आकडेवारी मिळवली होती. त्या वेळी अख्ख्या भारतात इंग्रज सरकारला दारू विक्रीपासून दर वर्षी २५ कोटी रुपये कर मिळत होता. गांधीजींनी दारूविरुद्ध लोकशिक्षण व दुकानांवर पिकेटिंग सुरू केलं.



डॉ. अभय

मार्ग सापडला. गडचिरोलीची आकडेवारी गोळा केली. जिल्ह्याच्या विकासाचं बजेट १४ कोटी रुपये व दारूचा एकूण खप २० कोटी रुपये आढळला. गरिबीचं एक कारण या दारूच्या अर्थशास्त्रात सापडलं. दारू दुकानांविरुद्ध पिकेटिंग सुरू झालं. गावागावात लोकांनी "गावाची दारूमुक्ती' लागू केली. राज्य सरकारला न जुमानता २ ऑक्टोबर १९९२ पासून जिल्ह्यात "जनतेची दारूमुक्ती' सुरू करण्यात आली. गडचिरोलीच्या जंगलात गांधी आमच्यासोबत लढत होता. ""अन्यायी सत्तेशी टक्कर देण्यासाठी तुम्ही हातात दगड किंवा बंदूक घेण्याची गरज नाही. एकच छोटीशी कृती करा. त्या राक्षसाकडे पाठ फिरवा व त्याची आज्ञा पाळण्यास नकार द्या. तुम्ही बघाल, की तुमच्या नकारापुढे तो राक्षस हतबल आहे. तो शेवटी गुडघे टेकून तुम्हाला शरण येईल."

पाच वर्षे आंदोलनानंतर शेवटी १९९३ मध्ये सरकारने पूर्ण जिल्ह्यात दारूबंदी लागू केली. पहिल्याच वर्षी जिल्ह्यातली ६० टक्के दारू कमी झाली. लोकांचे १२ कोटी रुपये वाचले. घराघरातल्या भेदरलेल्या उपाशी बाया व मुलांच्या पोटात अन्न पोचलं.

पण समस्या अजून संपलेली नाही. या वर्षी पूर्ण महाराष्ट्रात दारू विक्रीपासून शासनाला ४००० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. कोण कृती सुरू करणार?

* * * *

दक्षिण आफ्रिकेत गेलो तेव्हा जिथे जिथे गांधी राहिले, घडले तिथे जाऊन आलो. गांधींच्या जीवनातील टर्निंग पॉईंट ठरलेल्या पीटर-मरिट्झबर्गला गेलो. जवळपास शंभर वर्षांपूर्वी नुकत्याच आफ्रिकेत आलेल्या बॅरिस्टर गांधींना याच स्टेशनवर ट्रेनमधून खाली फेकून देण्यात आलं होतं. रात्रभर अपमान, थंडी व भीती अनुभवत गांधी त्या प्लॅटफॉर्मवर बसून होते. ""हा भयानक देश आहे. इथे कशाला राहायचं? भारतात परत जाऊ का?"

इथेच गांधींचा पळून न जाता लढण्याचा निश्चय झाला. इथेच त्यांनी आपला सत्याग्रह केला व गोऱ्या लोकांसोबत ट्रेनने प्रवास करण्याचा आपला हक्क मिळवला. माझ्यासाठी ही जागा काशीहून पवित्र. कुरुक्षेत्र!

या घटनेला शंभर वर्षे पूर्ण झाली, तेव्हा या रेल्वे प्लॅटफॉर्मवर गांधीजींच्या स्मृतीत मोठा हॉल बनवण्यात आला. १९९६ मध्ये त्या हॉलचं उद्घाटन करताना नेल्सन मंडेला म्हणाले, ""शंभर वर्षांपूर्वी भारताने आमच्याकडे एक अडखळणारा शिकाऊ वकील पाठवला. वीस वर्षांनंतर आम्ही भारताला एक महात्मा परत केला."

प्रत्येकाच्या जीवना एक पीटर-मॅरिट्झबर्ग घडत असतं. अडखळणाऱ्या तरुणापासून महात्म्याच्या दिशेने प्रवास तेव्हा सुरु होऊ शकतो. आपण अजून प्लॅटफॉर्मवर बसून आहोत.

(डॉ. अभय बंग यांनी २००० मध्ये इंग्लंडमध्ये दिलेल्या भाषणावर आधारित.)

---